# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**शुक्रवार, दिनांक १५ मार्च, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री एकनाथ शिंदे,** रविंद्र वायकर **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईसह, ठाणे, नाशिक, गडचिरोली, नंदुरबार, धुळे या जिल्ह्यांमधील सुमारे ६०० आदिवासी पाडे अद्यापही अंधारात असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१३ मध्ये उघडकीस येणे, उपरोक्त पाडयांमध्ये वीज पुरवठा करण्यासाठी राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन दिला असतानाही संबंधित विभागाचे अधिकारी नियोजन करीत नसल्यामुळे या पाडयांमध्ये वीज पोहचत नसून निधी वापराविना पडून असणे, मुंबई महानगरपालिका आणि महावितरण कंपनीला वन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे बोरीवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील २२ पाडयांमध्ये अद्यापही वीज पुरवठा झालेला नसणे, राज्य शंभर टक्के प्रकाशमय असल्याचा दावा शासन करीत असताना मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरालगतचे हे आदिवासी पाडे गेल्या अनेक वर्षापासून अंधारात असणे, आदिवासींच्या कल्याणासाठी जिल्हा नियोजन मंडळाला निधी दिला जात असतानाही संबंधित अधिकाऱ्यांच्या नियोजनाअभावी सदर पाडे अंधारात असणे, याकडे शासनाचे जाणिवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष परिणामी आदिवासी बांधवांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सदर पाडयांना तात्काळ वीज पुरवठा करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **सर्वश्री. बाळा नांदगांवकर,** सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, मंगेश सांगळे **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूरच्या कारागृहातून मराठवाडयात सिनियर जेलर म्हणून माहे जानेवारी,२०१३ मध्ये पदोन्नतीवर बदली झालेल्या अधिकाऱ्याने नागपूर जेलर पदावर असताना जेलमधील कैद्यांना प्रति मिनिट १०० रुपये या दराने कारागृहातून मोबाईलवरुन संपर्क साधण्यास दिलेली परवानगी, तसेच प्रत्येकी २००० रुपये घेऊन कैद्यांना संचित रजेवर पाठवून फरार होण्याकरिता केलेली मदत, तसेच कैद्यांच्या महिला नातेवाईकांचे फोनवरुन बोलणे करुन देणे व संचित रजेवर सोडविण्याकरीता सदर जेलरकडून करण्यात आलेले शोषण,सदर जेलरने ९३७३६४४६५४ या मोबाईल नंबरवरुन फरार कैद्यांच्या संपर्कात राहून त्यांच्याकडून दरमहा २००० रुपयांप्रमाणे कमावलेली लाखो रुपयांची संपत्ती, शंकर लांडगे व देवानंद महाकाळकर या दोन जन्मठेपेच्या कैद्यांना सेवाग्राम (जि.वर्धा) पोलिसांनी अटक केल्यानंतर हे सर्व प्रकरण उघडकीस येणे, माहे जानेवारी,२०१३ मध्ये वा त्या दरम्यान करीम मिर्झा, ठाणेदार सेवाग्राम पोलीस ठाणे (जि.वर्धा) यांनी हे प्रकरण सर्व चौकशी करुन जिल्हा पोलीस अधिक्षकांमार्फत,नागपूर कारागृह उपनिरीक्षकांकडे पाठवूनही पदोन्नतीवर बदली म्हणून मराठवाडयात गेलेल्या या भ्रष्ट जेलरविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात न आल्याचे उघडकीस येणे,राज्यातील अन्य जेलर व कारागृह कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, राज्यात अतिरेकी कारवायात वाढ झालेली असतानाही, नागपूरच्या जेलरने कैद्यांकडून पैसे घेऊन त्यांना संचित रजेवर पाठवून पळून जाण्यास केलेली मदत व कैद्यांच्या महिला नातेवाईकांचे केलेले शोषण, या सर्वांचे पुरावे मिळूनही प्रशासनाने याबाबत कोणतीही कडक कारवाई न करणे व संबंधित जेलरला पदोन्नतीवर मराठवाडयात पाठविणे, यामुळे राज्यातील कोटयवधी जनतेचा तुरुंग प्रशासनावरील उडालेला विश्वास, तसेच पैसे देऊन जन्मठेपेच्या कैद्यालासुध्दा बाहेर पाहिजे तितके महिने मोकळेपणाने फिरता येत असल्याबद्दल निर्माण झालेला विश्वास व खात्री,संबंधित जेलरला निलंबित करुन त्याची पोलीसांच्या आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. चंद्रशेखर घुले,** मिलिंद कांबळे, किसन कथोरे, रमेश थोरात, ॲड. अशोक पवार **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शेवगाव, पाथर्डी व इतर ४४ गावांसाठी असलेली प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना ही ३० वर्षापूर्वीच्या लोकसंख्येवर आधारित असल्याने योजनेचा पाणी पुरवठा अपुरा पडणे, सदर योजनेचा पाणी पुरवठा सुधारीत करण्याबाबत दिनांक १४ डिसेंबर, २०१२ रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्यासोबत बैठका घेऊनही सदर योजना प्रलंबित राहणे, तसेच हातगाव व इतर २८ गावांसाठी पाणीपुरवठा योजना १५ वर्षापूर्वी मंजूर होऊनही कार्यान्वित न होणे, परिणामी नागरिकांना पाण्याची टंचाई निर्माण होणे, याबाबत दोन्ही तालुक्यातील नागरिकांची सदर पाणीपुरवठा योजना सुरू करण्याची होत असलेली मागणी, याबाबत करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (शेवटचा दिवस).**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १४ मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.